**ठळक बातम्या**

- देशासह जगभरात नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह विविध मान्यवरांकडून देशवासियांना शुभेच्छा

- २०२५ हे वर्ष संरक्षण क्षेत्रासाठी सुधारणा वर्ष असेल, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांची घोषणा

- व्यावसायिक वापराचं गॅस सिलिंडर १५ रुपयांनी स्वस्त, घरगुती वापराच्या सिलिंडरच्या किंमती जैसे- थे

**आणि**

- जागतिक ब्लिट्झ बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आर. वैशाली पराभूत

**<><><><><>**

देशासह जगभरात नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत केलं जात असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**होल्ड व्हाइस कास्ट**

*भारताच्या दैदिप्यमान, सर्वसमावेशक आणि शाश्वत भविष्यासाठी एकजुटीनं कार्य करण्याच्या वचनबद्धतेला आपण पुन्हा एकदा उजाळा देऊ या, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.*

*संविधानकर्त्यांच्या स्वप्नांना साकार करत २०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी कार्य करण्याची हीच वेळ असल्याची आठवण उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात करुन दिली आहे.*

*तर नवीन वर्षात सर्व देशवासीयांना उत्तम आरोग्य, समृद्धी, नवनवीन संधी, यश आणि आनंद मिळो, अशी शुभकामना प्रधानमंत्र्यांनी केली आहे.*

*सामाजिक विषमता दूर करून समतावादी समाज निर्माण करण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहूया असं राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.*

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या जनतेला नववर्षाच्या शुभेच्छा देताना 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' असा संकल्प केला आहे. कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि प्रत्येक नागरिकाच्या योगदानानं महाराष्ट्राला प्रगतीच्या शिखरावर नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.*

*'विकसित भारत' आणि 'प्रगतीशील महाराष्ट्र' घडवण्यासाठी प्रयत्न करू असा संकल्प करून जनतेच्या सुखसमृध्दीसाठी राज्य सरकार काम करेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे.*

*तर नवीन वर्ष जनतेला विकासाच्या नवनवीन संधी उपलब्ध करून देणारं आणि महाराष्ट्राला सर्वांगीण प्रगतीच्या वाटेवर घेऊन जाणारं ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.*

**<><><><><>**

श्रोते हो, २०२४ या वर्षभरात आर्थिक क्षेत्रात घडलेल्या घडामोडींचा आढावा आज आपण ‘सरत्या वर्षाच्या पाऊलखुणा’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून घेणार

आहोत. रात्री सव्वा ७ वाजता अस्मिता वाहिनीसह, news on air हे ॲप आणि समाजमाध्यमांवर आपल्याला हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

संरक्षण क्षेत्रात सध्या सुरु असलेल्या आणि नव्यानं सुरु केल्या जाणाऱ्या सुधारणांना गती देण्याच्या उद्देशानं २०२५ हे वर्ष सुधारणांचं वर्ष असेल, असं संरक्षण मंत्रालयानं घोषित केलं आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल नववर्षाच्या पूर्वसंध्येला संरक्षण मंत्रालयातल्या सचिवांसोबत बैठक घेऊन विविध महत्वपूर्ण योजना, प्रकल्प आणि भविष्यातल्या उपक्रमांचा आढावा घेतला. देशाच्या सशस्त्र दलाच्या आधुनिकीकरणाच्या प्रवासात हे वर्ष ऐतिहासिक ठरेल, देशाच्या संरक्षण सज्जतेमध्ये यावर्षी अभूतपूर्व वाढ दिसून येईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सशस्त्र दलांना तत्रंज्ञानाच्या बाबतीत अधिक स्वयंपूर्ण करून अनेक पातळ्यांवर लढल्या जाणाऱ्या युद्धाला सामोरं जाण्यासाठी त्यांना सक्षम करणं हा यामागचा उद्देश असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

येत्या १५ जानेवारीला मुंबईत होणाऱ्या कार्यक्रमात नौदलाच्या ताफ्यात २ युद्ध नौका आणि १ पाणबुडी समाविष्ट होणार आहे. निलगिरी ही स्टील्थ फ्रिगेट प्रकारातली आणि सुरत ही विनाशक प्रकारातली युद्धनौका तसंच वागशीर या स्कॉर्पियन श्रेणीतल्या पाणबुडीचा यात समावेश आहे. दोन्ही युद्धनौकांवर दिवसा आणि रात्री हेलिकॉप्टर उतरू शकतात आणि उड्डाण करू शकतात. महिला अधिकारी आणि जवानांना राहण्यासाठी या युद्धनौकांवर विशेष सोय आहे. माझगाव डॉकनं या स्वदेशी बनावटीच्या युद्धनौका आणि पाणबुडी बनवली आहे.

**<><><><><>**

पुण्याजवळ कोरेगाव भीमा या ठिकाणी आज दोनशे सातव्या शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभाचं दर्शन घ्यायला हजारोजण जमले आहेत. शहर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज शौर्य दिनानिमित्त विजय स्तंभास अभिवादन केले. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही आज भीमा कोरेगाव इथल्या विजयस्तंभाला अभिवादन केलं. विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी हजारो लोकांची उपस्थिती हा संघर्ष जिवंत असल्याचे निदर्शक आहे असं ते या वेळी म्हणाले. भिमा कोरेगाव लढाईतला प्रत्यक्ष संघर्ष संपला असला तरी मानसिक संघर्ष अद्याप सुरूच आहे आणि तो संपेपर्यंत मानवतेच्या प्रतिकांना अभिवादन करायला माणसं जमतील अशी आपली भावना असल्याचं त्य़ांनी सांगितलं.

**<><><><><>**

पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक वापराचे गॅस सिलिंडर १५ रुपयांनी स्वस्त केलं आहे. मुंबई आता १९ किलो वजनाचं LPG सिलेंडर १ हजार ७५६ रुपयांना मिळेल. घरगुती वापराचे LPG सिलिंडरच्या किंमतीत मात्र काहीही बदल झालेला नाही. त्यामुळं हे सिलिंडर ८०२ रुपये ५० पैशांना मिळेल.

**<><><><><>**

विद्यार्थ्यांना विद्वत्तायुक्त संशोधन लेख आणि पत्रिका प्रकाशनांमधलं ज्ञान सहज उपलब्ध व्हावं या उद्देशानं आखण्यात आलेल्या वन नेशन वन सबस्क्रिप्शन योजनेला आजपासून प्रारंभ झाला. यामुळे सरकारी अनुदान असलेल्या शैक्षणिक संस्था, विद्यापीठं आणि भारतीय तंत्रज्ञान संस्थेतल्या देशभरातल्या सुमारे १ कोटी

८० लाख विद्यार्थ्यांना जगभरातल्या उच्च दर्जाच्या नियतकालिकांमध्ये उपलब्ध असलेल्या ज्ञानाचं भांडार खुलं होईल. यामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, वैद्यकीय, गणित, व्यवस्थापन, सामाजिक शास्त्र आणि मानवता या विषयांमधल्या १३ हजार ४०० आंतरराष्ट्रीय पत्रिका उपलब्ध असतील. या योजनेच्या पुढच्या टप्प्यात ही सुविधा खाजगी शैक्षणिक संस्था आणि त्यानंतर सर्वांसाठीच सुरु केली जाईल असं देशाचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार अजय कुमार सूद यांनी सांगितलं.

<><><><><>

देशाच्या उत्तर भागात दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने रेल्वेगाड्या उशीराने धावत आहेत. दिल्लीहून सुटणाऱ्या किंवा तिथे पोचणाऱ्या बावीस गाड्या दोन तासांपर्यंत उशीराने धावत आहेत, अशी माहिती रेल्वे व्यवस्थापनाने दिली आहे.

प्रवाशांनी स्थानकावर पोहोचण्याआधी आपापल्या रेल्वेगाडीच्या वेळेत बदल झाला असल्यास जाणून घेऊन मग प्रवासाला सुरुवात करावी, असं आवाहन रेल्वेनं केलं आहे.

<><><><><>

मणिपूरमधल्या हिंसाचारामुळे स्थलांतरित व्हावं लागलेल्या नागरिकांना राज्य सरकार ५०हजार रुपयांपर्यंतचं कर्ज विनातारण देणार आहे. मुख्यमंत्री उद्योजकता सहाय्य योजनेतून हे कर्ज देण्यात येईल अशी घोषणा मुख्यमंत्री एन. बीरेन सिंग यांनी काल केली. या योजनेअंतर्गत याआधीच ४२६ लोकांना व्यवसायासाठी कर्ज दिल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

रशियामध्ये आजपासून पर्यटन कर लागू करण्यात आला आहे. अधिकृत रशियन वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार हॉटेल्स किंवा निवासस्थानांकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्कावर आजपासून पर्यटकांना एक टक्का पर्यटन कर द्यावा लागणार आहे. जुलै २०२४ मध्ये रशियन टॅक्स कोड मधल्या सुधारणांनुसार ही करआकारणी सुरु झाली आहे. या सुधारणांनुसार वर्ष २०२७ पासून या करात वाढ होऊन तो तीन टक्के होईल.

**<><><><><>**

येमेनची राजधानी साना इथं हौथी या लढाऊ गटाच्या लष्करी तळांवर अमेरिकन लष्कराने हवाई हल्ले केले आहेत. हौथीकडून चालवल्या जाणाऱ्या दूरचित्रवाहिनीने ही माहिती दिली. हौथीच्या संरक्षणदलाची इमारत तसंच दारुगोळा उत्पादनांचा कारखाना अशा ठिकाणांवर झालेल्या हल्ल्यांमुळे लक्षणीय नुकसान झाल्याचं या वृत्तवाहिनीनं म्हटलं आहे. तीस आणि एकतीस डिसेंबरला केलेले हे हल्ले तांबडा समुद्र आणि एडनच्या आखातातल्या अमेरिकी जहाजांना नुकसान पोचवण्याची हौथी बंडखोरांची क्षमता नष्ट करण्यासाठी असल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

जागतिक ब्लिट्झ बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेत पुरुषांचं विजेते पद मॅग्नस कार्लसन आणि यान निपोनमीशी यांना संयुक्तरित्या जाहीर झालं आहे. न्यूयॉर्कमध्ये काल झालेला अंतिम सामना बरोबरीत सुटल्यानं दोघांना संयुक्तरित्या विजेतेपदक देण्यात आलं.

महिलांच्या श्रेणीत चीनच्या जू वेनजून हिनं विजेतेपदक पटकावलं. चीनच्याच लेई तिंगजेई हिला तिनं पराभूत केलं.

भारताची आर वैशाली उपांत्य फेरीत पराभूत झाली. चीनच्या जू वेनजून हिनं तिला पराभूत केलं.

**<><><><><>**

हैदराबादमध्ये झालेल्या संतोष करंडक फुटबॉल राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पश्चिम बंगालनं काल आपलं ३३ वं विजेतेपद पटकावलं. त्यांनी केरळवर १-० असा विजय मिळवला. बंगालच्या रॉबी हंसडा यानं शेवटच्या काही मिनिटांमध्ये मिळवलेल्या या गोलनं पश्चिम बंगालचा ७ वर्षांचा विजेतेपदाचा दुष्काळ संपवला. हंसडा याच्या १२ गोल्सनं त्याला या स्पर्धेतला सर्वोत्तम खेळाडूचा पुरस्कार मिळवून दिला.

//<><><><><>//